(CNR No. MHKO170011432022)

| | |
|---|---|
| | **नियमित दिवाणी दावा १६९ /२०२२**<br>सौ. लिला राजाराम शिंगे<br>वि.<br>श्री.विजय महादेव बनकर वगैरे २ |

**निशाणी ३९ खालील आदेश पारीत**

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. १ यांनी त्यांचेविरुध्द ' ज्यादा कैफियत नाही ' बाबतचा झालेला आदेश रद्द होवून मिळणेबाबत दाखल केलेला आहे.

२. प्रतिवादींचे असे कथन आहे की, वादी यांनी सदरचा दावा प्रतिवादी यांचेविरुध्द कायम मनाई होऊन मिळणेसाठी दाखल केलेला आहे. प्रस्तुत कामी वादी यांनी निशाणी ३३ वरील न्यायालयाच्या आदेशानुसार दाव्यामध्ये दुरुस्ती केलेली असून प्रस्तुतचा दावा प्रतिवादीने ज्यादा कैफियत देणेवर नेमणेत आला आहे. परंतू दिनांक ०५.०५.२०२५ रोजी प्रतिवादी यांचेविरुध्द " ज्यादा कैफियत नाही " असा आदेश पारीत करणेत आलेला आहे. प्रतिवादी क्र. १ यांनी कैफियत दाखल करणेस जाणुनबुजून विलंब केलेला नाही. प्रतिवादी क्र. १ हे पुजा अर्चा करुन त्यांचा उदरनिर्वाह करीत असल्यामुळे त्यांना कामानिमित्त परगावी जावे लागलेने त्यांना मुदतीत वकिलांना भेटून ज्यादा कैफियत देणे करीता विलंब झालेला आहे त्यामुळे त्यांचेविरुध्द ज्यादा कैफियत नाही असा झालेला आदेश रद्दबातल होवून मिळणेविषयी विनंती केली.

३. वादी यांनी याच अर्जावर त्यांचे म्हणणे दाखल करुन प्रतिवादींची संपुर्ण कथने नाकारली आहेत. प्रतिवादी यांनी ब-याच मुदती घेतल्या आहेत व मुदतीचा अर्ज नामंजूरही झाला आहे. प्रतिवादी यांनी विलंबाबतचे कोणतेही संयुक्तीक कारण दिलेले नाही. सबब प्रतिवादी क्र.१ यांनी जाणुन बुजुन ज्यादा कैफियत देणेस टाळाटाळ केलेली आहे. त्यामुळे अर्ज नामंजूर करावा अशी विनंती वादी यांनी केली तसेच जर अर्ज मंजूर करावयाचा असेल तर प्रतिवादीस ३०००/- रुपये दंड करणेत यावा अशी देखील विनंती केली .

४. प्रतिवादींचा अर्ज त्यावरील वादीचे म्हणणे व दोन्ही बाजुचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रतिवादी यांनी निशाणी

३७ वरील अर्जाद्वारे कैफियत देणेस मुदत घेवूनही त्यांनी वेळेत कैफियत दाखल केली नाही अगर त्या अर्जावर माझे पुर्वाधिकारी यांनी पारीत केलेल्या आदेशाप्रमाणे दंडाची रक्कम देखील भरली नाही, तथापी त्यांचा निशणी ३८ चा कैफियत देणेस मुदतीचा अर्ज नामंजूर करणेत आला व त्यांचेविरुध्द "ज्यादा कैफियत नाही" असा आदेश पारीत करणेत आल्याचे दिसून येते. प्रस्तुत अर्जाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रतिवादी क्र. १ हे पुजारी असून त्यांना पुजा-अर्चा करणेकरीता बाहेर गांवी जावे लागत असल्यामुळे त्यांनी मुदतीत त्यांची कैफियत दाखल केलेली नाही. अशा परिस्थितीत नैसर्गीक न्यायतत्वानुसार प्रतिवादी यांना " ज्यादा कैफियत " दाखल करणेस संधी देणे संयुक्तीक व न्यायोचीत होणार आहे. सबब प्रस्तुत प्रतिवादी क्र. १ यांस " ज्यादा कैफियत " देणेस संधी दिलेस दाव्याचा गुणदोषावर निर्णय होणेस मदत होणार आहे तसेच त्यामध्ये वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. सबब सदरचा अर्ज काही अंशी कॉस्टवर मंजूर करणेच्या निर्णयावर येवून खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## <u>आ दे श</u>

१. अर्ज हा प्रतिवादी क्र. १ यांनी वादीस यांस रक्कम रुपये ७००/- इतकी कॉस्ट पुढील तारखेपर्यंत देण्याच्या अटीवर मंजूर करणेत येतो.

२. प्रतिवादी क्र. १ यांचेविरुध्द झालेला " ज्यादा कैफियत नाही " चा आदेश रद्द करणेत येत आहे.

Digitally signed by SONALI VIJAYKUMAR JANGAMSWAMI
Date: 2025.07.16 12:05:45 +0530

दिनांक १४.०७.२०२५.

श्रीमती एस.व्ही. जंगमस्वामी ,
दिवाणी न्यायाधीश क.स्तर,पन्हाळा.